## महत्वाचे...

### व्हॉट्सॲप लिंकवरून तब्बल ११ लाखांची ऑनलाईन फसवणूक

पिंपरी । प्रतिनिधी

संत तुकारामनगर परिसरातील एका डॉक्टरांची तब्बल ११ लाख १५ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी संजय बाबर (वय ५२) यांना अनोळखी मोबाईल क'मांकावरून व्हॉट्सॲपवर लिंक पाठवण्यात आली. त्यांनी ती लिंक उघडल्यावर त्यांच्या मोबाईलमध्ये संशयास्पद ॲप डाऊनलोड झाले. त्यानंतर शेअर मार्केटिंगमध्ये गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून फिर्यादींकडून विविध बँक खात्यांवर पैसे जमा करण्यास सांगण्यात आले. या पद्धतीने आरोपींनी एकूण ११ लाखांहून अधिक रक्कम लाटली. या प्रकरणी माहिती तंत्रज्ञान कायदा २००० व भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून आरोपी अद्याप फरार आहेत. पुढील तपास पोलीस करत आहेत.

### देहुरोड येथे युवकाकडून देशी पिस्तूल जप्त

देहुरोड । प्रतिनिधी

देहुरोड एम. व्ही. कॅम्प परिसरातील पाण्याच्या टाकीखाली कारवाई करत पोलिसांनी एका युवकाला देशी बनावटीचे पिस्तूल व जिवंत राऊंडसह अटक केली आहे. ही कारवाई सोमवारी (दि.१८ ऑगस्ट) दुपारी करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी अरुण धर्मदेव शर्मा (२१, रा. यमुनादेवी कॉलनी, एम. व्ही. कॅम्प, देहुरोड) हा मनाई आदेशाचे उल्लंघन करून बेकायदेशीर शस्त्रासह सापडला. त्याच्या ताब्यातून ५० हजार रुपये किंमतीचे देशी बनावटीचे पिस्तूल व एक राऊंड जप्त करण्यात आले. सदर आरोपीविरुद्ध शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) सह १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी अटकेत आहे. पुढील तपास देहुरोड पोलीस करीत आहेत.

### दापोडीत तरुणाकडून बेकायदेशीर पिस्तुल जप्त

चिंचवड । प्रतिनिधी

गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने दापोडी येथे कारवाई करून एका तरुणाला देशी बनावटीचे पिस्तुल व जिवंत काडतूसासह अटक केली आहे. दि. १८ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास दापोडी–सांगवी संगम क्रॉस रोडजवळील सुर्यमुखी महादेव मंदिराजवळ आरोपी राहुल संजय सरोदे (वय २३, रा. एस.टी. कॉलनी, जुनी सांगवी) हा ५० हजार रुपये किंमतीचे देशी बनावटीचे पिस्तुल अनधिकृतपणे बाळगताना पोलिसांना मिळून आला. या प्रकरणी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तांनी जारी केलेल्या मनाई आदेशाचे उल्लंघन झाल्याने दापोडी पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९४९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

# पुणे मनपाच्या कंत्राटी काम गारांना बोनस मिळणार

पुणे । प्रतिनिधी

महानगरपालिकेमध्ये सुमारे साडेदहा हजार कंत्राटी कामगार विविध खात्यांमध्ये अनेक वर्षांपासून काम करीत आहेत. या सर्व काम गारांना बोनस ॲक्ट प्रमाणे बोनस मिळावा, पगारी रजा मिळाव्यात,१५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे आणि २ ऑक्टोबर या राष्ट्रीय सणांच्या सुट्ट्या कायद्याप्रमाणे याचा लाभ मिळावा अशा मागण्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होत्या. राष्ट्रीय मजदूर संघाकडून या सर्व कर्मचाऱ्यांना संघटित करून गेली ६ वर्ष वेळो वेळी विविध प्रकारची आंदोलने महापालिकेच्या गेटवर करण्यात आलेली होती. कामगार नेते सुनील शिंदे यांनी स्वत: तीन दिवस आमरण उपोषण आंदोलन पुणे महापालिकेच्या गेटवर केलेले होते परंतु फक्त आश्वासनावरच मनपा अधिकाऱ्यांनी बोळवण करून हे सर्व प्रश्न प्रलंबित ठेवले होते. या सर्व प्रश्नांच्या संदर्भा मध्ये मागील आठवड्यामध्ये संघटनेतर्फे कंत्राटी कामगारांचा मोर्चा



स्वारगेट येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळ्यापासून ते पुणे महानगरपालिकेच्या गेट पर्यंत काढण्यात आला होता. त्यावेळेला महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांना राष्ट्रीय मजदूर संघटनेकडून निवेदन देऊन बैठक आयोजन करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्याप्रमाणे आज दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी पावणेअकरा वाजता महानगरपालिकेच्या सभागृहात महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या उपस्थितीमध्ये बैठक झाली. या बैठकीसाठी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त दिवटे साहेब, कामगार सल्लागार नितीन केंजळे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा नाईक, उद्यान विभागाचे अधिकारी अशोक घोरपडे साहेब व इतरही विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीसाठी महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाचे सहाय्यक कामगार आयुक्त गजानन शिंदे हे उपस्थित होते. राष्ट्रीय मजूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे, उपाध्यक्ष सिताराम चव्हाण, संघटक विशाल बागुल, प्रतिनिधी बाबा कांबळे, विजय पांडव, अरविंद आगम, संदीप पाटोळे, उज्वल साने, लक्ष्मण मासाळ हे कामगार प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीमध्ये माननीय आयुक्तांसम ोर कंत्राटी कामगारांना कायदा प्रम ाणे बोनस देय असून महापालिका मात्र कंत्राटदारांना बोनसचे पैसे देत नसल्यामुळे कंत्राटदार बोनस देत नाही अशा प्रकारची मागणी संघटनेतर्फे मांडण्यात आली. त्यास सहाय्यक कामगार अधिकारी गजानन शिंदे साहेब यांनी कंत्राटी कामगारांना कायद्याप्रमाणे बोनस देय असून त्यांना बोनस दिला पाहिजे अशी बाजू मांडली. त्याचबरोबर या सर्व कामगारांना राष्ट्रीय सणांच्या सुट्ट्या यादेखील कायद्याप्रमाणे देय असून त्याचा कायद्याप्रमाणे लाभ या कंत्राटी कामगारांना दिला गेला पाहिजे व वार्षिक रजा ही पगारी राजा कामगारांना दिल्या पाहिजेत अशी कामगारांची बाजू व सरकारची कामगार विभागाची बाजू या बैठकीत मांडले.

# मान्सूनच्या पार्श्वभूमीवर सर्व संबधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे : जिल्हाधिकारी

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यात धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे बाधित होणारे पुरग'स्त भाग तसेच दरडप्रवण भागातील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थालंतर करावे, मान्सूनच्या पार्श्वभूमीवर सर्व संबधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी दिले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल, पुणे महानगरपालिका, प्रादेशिक सार्वजनिक बांधकाम मंडळ जलसंपदा, आरोग्य, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास



अधिकारी, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, सैन्यदल, नगरपरिषद, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आदी सर्व संबधित विभागाचे अधिकारी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

डुडी म्हणाले, भारतीय हवामान खात्याने आज (दि.१९ ऑगस्ट) आणि उद्या (दि. २० ऑगस्ट) रोजी घाटमाथा परिसरात रेड अलर्ट तर शहर आणि ग्रामीण भागात ऑरेंज अलर्ट दिलेला आहे. जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू असून जी धरणे भरली आहेत त्या ठिकाणी जलसंपदा व शासकीय यंत्रणेमार्फत लक्ष ठेवण्यात येत आहे. जलसंपदा विभागाने पाऊसाचा अंदाज आणि त्यांनी धरणातील आवक लक्षात घेता विसर्गाबाबत नियोजन करावे. याबाबत किमान दोन तास अगोदर जिल्हा नियंत्रण कक्षास कळवावे.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, सैन्यदलानी आपली पथके सुसज्ज साहित्यासह दक्ष ठेवावे. नदीकाठच्या लोकांना ज्या ठिकाणी धोका पोहोचण्याची शक्यता आहे, त्यांना सावध करण्यासाठी शासकीय यंत्रणेमार्फत संदेश पोहोचवण्याचे काम करण्यात येत आहे. सर्व नागरिकांना खबरदारी घ्यावी, असे आवाहन श्री. डुडी यांनी केले.

यावेळी सर्व संबंधित यंत्रणेने मान्सूनच्या अनुषंगाने पुर्वतयारी व करीत असलेली कार्यवाहीबाबत माहिती दिली.



अखिल शिवाजी नगर गावठाण मधील तरुण सामाजिक कार्यकर्ते गुरुदत्त सेवा मंडळ ट्रस्टचे संस्थापकीय अध्यक्ष डॉ. गिरीश सुदामराव बहिरट पाटील यांनी मॅनेजमेंट मध्ये संशोधन प्रबंधसाठी झहव पूर्ण केल्यामुळे भारती विद्यापीठ तर्फे डॉक्टरेट पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांना पोलीस मित्र संघटनाच्या वतीने मा. आमदार मोहन दादा जोशी यांच्या शुभ हस्ते सन्मानित करण्यात आले, ह्याप्रसंगी पोलीस मित्र संघटनाचे प्रदेश अध्यक्ष श्री राजेंद्र कपोते, उप अध्यक्ष राजाभाऊ कदम, पी. एम. टी. मा अध्यक्ष श्री चंद्रशेखर कपोते उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिन उत्सवात नॉव्हेल इंटरनॅशनल विद्यालयाचा राष्ट्रप्रेमाने उजळलेला सोहळा

चिंचवड । प्रतिनिधी

चिंचवड येथील नॉव्हेल इंटरनॅशनल विद्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन विशेष उत्साहात साजरा करण्यात आला. इतिहास, संस्कृती आणि शिक्षण यांचा संगम साधत, या विद्यालयाने राष्ट्रप्रेमाचा एक अनोखा आदर्श उपस्थितांसमोर ठेवला.

कार्यक'माची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी देशभक्तीच्या भावना जागृत केल्या. यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेली भक्तिगीते, देशभक्तिपर नाटिका व नृत्य यांनी कार्यक'मात रंगत आणली.या प्रसंगी नॉव्हेल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि आमदार मा. श्री. अमित गोरखे, संचालक श्री. विलास जेऊरकर, विद्यालय व्यवस्थापक डॉ. प्रिया गोरखे, तांत्रिक विभाग प्रमुख श्री. समीर जेऊरकर आणि मु'याध्यापिका सौ. मृदुला गायकवाड आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक'माचे खास आकर्षण म्हणजे शाळेचे दोन माजी विद्यार्थी – अरबाज कलावंत आणि वैभव चव्हाण – यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती. शिक्षणाच्या जोरावर त्यांनी गाठलेली यशस्वी शिखरे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायक ठरली.आमदार श्री. अमित गोरखे यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना उद्देशून केलेल्या भाषणात स्वातंत्र्य दिनाचे महत्व पटवून देत, नव्या पिढीकडून सामाजिक योगदानाची अपेक्षा व्यक्त केली. तसेच, स्टुडन्ट कौन्सिल सदस्यांची औपचारिक निवडही याच दिवशी पार पडली.

यावेळी पोलीस निरीक्षक श्री. संतोष कसबे यांनी उपस्थित राहून 'अमली पदार्थांपासून मुक्त समाज' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांच्या मनोवेधक भाषणाने उपस्थितांमध्ये सामाजिक भान निर्माण केले. या कार्यक'माला पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अग्निशामक जवानांना आधुनिक साधनांचे प्रशिक्षण

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिका अग्निशामक विभागात नव्याने नियुक्त झालेल्या अग्निशामक जवानांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि व्यापक प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश नवोदित जवानांना आधुनिक तंत्रज्ञानाची आणि उपकरणांची ओळख करून देणे, आपत्कालीन परिस्थितीत शिस्तबद्ध आणि जलद प्रतिसाद देण्याचे कौशल्य विकसित करणे, तसेच प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे उपकरणांचा परिणामकारक वापर शिकवणे हा होता.

या प्रशिक्षण सत्रादरम्यान जवानांना फायर होजचा योग्य वापर व त्यासंबंधित तांत्रिक माहिती, पाणी व फोम टेंडरची सुरक्षित आणि कार्यक्षम हाताळणी, विविध प्रकारच्या आगींवर नियंत्रण मिळवण्यासाठी लागणार्या आधुनिक तंत्रांचा वापर, संघभावना, नेतृत्वगुण आणि आपत्कालीन निर्णयक्षमता यांचे प्रशिक्षण देण्यात आले.

यासोबतच अत्याधुनिक अग्निशमन साधनांच्या प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून त्यांच्या कार्यपद्धती व वापराबाबत जवानांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

# गणेशोत्सव निर्विघ्न व निर्भयपणे साजरा करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करा : पोलीस आयुक्त

पुणे । प्रतिनिधी

यंदाचा गणेशोत्सव हा शासनाने राज्योत्सव म्हणून जाहिर केले आहे पूर्वीपासून पुणे जिल्ह्यातील गणेशोत्सव जगभर प्रसिध्द आहे. यावर्षी सुध्दा गणेशात्सव शांततेत व निर्विघ्नपणे आणि मोठ्या उत्सहात साजरा व्हावा यासाठी प्रशासन, महानगरपालिका, पोलिस विभाग व सर्व गणेशमंडळांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन पोलिस आयुक्त अमितेश कुमार



यांनी केले.

शहरातील गणेशोत्सव शांततेत व निर्विघ्नपणे पार पडावा या दृष्टीने शहरातील सर्व गणपती मंडळाचे अध्यक्ष यांची संयुक्त बैठकीचे आज बाल गंधर्व रंग मंदिर येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, सह पोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, शहरातील गणपती मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीच्या सुरूवातीला गणपती मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्या यानंतर बोलतांना पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार म्हणाले की, शासनाने यावेळी गणेशोत्सवास राज्योत्सवाचा दर्जा दिला आहे. पूर्वीपासूनच आपल्या शहरातील गणेशोत्सव खूप प्रसिध्द आहे त्यामुळेच आपल्या शहरातील गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने, शांततेत व निर्विघ्नपणे तसेच निर्भयमुक्त वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. शहरातील गणपती मंडळांनी कोणतेही वाद विवाद घडतील असे देखावे करू नयेत. पाऊस सुरू आहे त्यामुळे वीजेची कामे करतांना काळजी घ्यावी असे त्यांनी यावेळी सांगितले.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'झेंडा उंचा रहे हमारा' कार्यक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद...

पिंपरी । प्रतिनिधी

आकाशामध्ये डौलाने फडकणारा तिरंगा आणि दुसरीकडे 'ऐ वतन, वतन मेरे आज़ाद रहे तू', 'दिल दिया है, जान भी देंगे ये वतन तेरे लिये', 'आय लव्ह माय इंडिया', 'जय जय महाराष्ट्र माझा', 'वंदे मातरम' यांसारख्या हृदयाला भिडणाऱ्या देशभक्तिपर गाण्यांचे सादरीकरण... असा देशप्रेम, शौर्य आणि ऐक्याचा अद्वितीय संगम पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त निगडी येथील भक्ती शक्ती येथे आयोजित केलेल्या 'झेंडा उंचा रहे हमारा' या कार्यक्रमात पाहायला मिळाला.

भारताच्या स्वातंत्र्यदिनाचा ७८ वा वर्धापन दिन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात ध्वजारोहण आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर महापालिकेच्या वतीने निगडी येथील भक्ती शक्ती चौकात आयोजित देशभक्तिपर गीतांच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे यांनी याप्रसंगी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास आणि त्यातून मिळालेल्या स्वातंत्र्याचे महत्त्व सांगितले. तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने 'घरोघरी तिरंगा – घरोघरी स्वच्छता' या मोहिमेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली

ेशभक्तिपर गीतांच्या कार्यक्रम अनुभवण्यासाठी महापालिकेचे मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे,मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे,मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओम प्रकाश बहिवाल,विशेष अधिकारी किरण गायकवाड,कार्यकारी अभियंता संतोष दुर्गे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशभक्तिपर गीतांच्या सादरीकरणासोबतच 'भारत माता की जय', 'वंदे मातरम', 'हम सब एक हैं' अशा घोषणांचा आवाज येथे दुमदुमत होता. उत्साह, अभिमान आणि राष्ट्रभक्तीची भावना प्रत्येकाच्या मनात जागवणारे असे वातावरण येथे होते.

या कार्यक्रमात 'ए वतन, वतन मेरे आज़ाद रहे तू', 'दिल दिया है जान भी देंगे', 'तेरी मिट्टी में मिल जावां', 'एक तू ही भरोसा', 'देश रंगीला', 'जय जय महाराष्ट्र माझा', 'कर हर मैदान फतेह', 'संदेसे आते हैं', 'मेरा रंग दे बसंती चोला', 'वंदे मातरम' यांसारखी अनेक लोकप्रिय गाणी हिंदी व मराठी भाषेतील देशभक्तीपर गीते एकत्र येऊन देशप्रेमाचे सुंदर वातावरण तयार झाले होते.या कार्यक्रमाचे नियोजन महापालिकेचे सहशहर अभियंता मनोज सेठीया यांनी केले होते. तर गायक सतीश इंगळे,अमित दीक्षित, दीपक माने, आशिष देशमुख, किरण अंदुरे, पृथ्वीराज अंदुरे, गायिका मनीषा निश्चल दृष्टी बालानी, प्रीती बिजवे यांनी देशभक्तीची गाणी सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. स्वराज मुझिक स्वराज म्युझिक बँडच्या ९ प्रतिभावान वादकांनी त्यांना उत्तम साथ दिली. कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन महापालिकेचे उपअभियंता किरण अंधुरे यांनी केले.

# विद्यापीठ चौकातील वाहतूक कोंडी सुटणार

पिंपरी । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील दुमजली उड्डाणपुलाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी (दि.२०) सायंकाळी करण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून या उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली असून बुधवारी लोकार्पण झाल्यानंतर रहदारीसाठी हा उड्डाणपुल खुला करण्यात येईल. परिणामी वाहनधारकांसह नागरिकांना या भागातून प्रवास करणे सुकर होणार असल्याची माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिली. पुणे विद्यापीठ चौकामध्ये तसेच गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक कोंडीच्या निराकरणासह दिर्घकालीन वाहतूक व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी या एकात्मिक दुम जली उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली असून यासाठी अंदाजित रु.२७७ कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त आहे.

या भागातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तसेच अस्तित्वातील वाहतुकीस पुरेसा रस्ता उपलब्ध व्हावा म्हणून गणेशखिंड रस्त्याचे पुणे विद्यापीठ ते भारतीय कृषी महाविद्यालय (ठइख) या लांबीमध्ये पुणे मनपा विकास आराखड्यानुसार ४५ मी. पर्यंत रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे.

बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण झाल्यानंतर या उड्डाणपुलाची एक मार्गिका (औंध – शिवाजीनगर) वाहतुकीसाठी खुली करण्यात येणार आहे. शिवाजीनगर व औंध बाजूकडील रॅम्पचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित बाणेर व पाषाण बाजूकडील रॅम्पचे बांधकाम ऑक्टोबर २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन पीएमआरडीएच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी सांगितले.



### तळेगाव दाभाडे येथे गावठी पिस्तुलांसह युवक अटक

पिंपरी । प्रतिनिधी

घोरावडेश्वर पायथ्याजवळील प्रदीप सिरेमिक क'ॉकरी शॉप शेजारील मोकळ्या जागेतील शेडमध्ये सापळा रचून कारवाई करण्यात आली. या कारवाईत सोहम सागर शिंदे (वय २१, रा. जांभुळगाव, मावळ) या तरुणाच्या ताब्यातून ७१,००० किमतीची दोन देशी बनावटीची गावठी पिस्तुले व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७ (१) सह १३५ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

### बेकायदेशीर कट्टा पिस्तुलासह शेतकरी जेरबंद

पिंपरी । प्रतिनिधी

म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत बेलवाडी गावातील गाभा मंदिराजवळील साईराज चौक येथे मंगलमूर्ती हॉस्पिटल समोर, दि. १८ ऑगस्ट रोजी दुपारी ४.१५ वाजता पोलिसांनी केलेल्या कारवाईत एक जण देशी कट्टा पिस्तुलासह रंगेहात पकडला.